जनसंपर्क अधिकारी कार्यालय ठाणे शहर

P.R.O. OFFICE DCP ZONE 4 THANE CITY

Address - office of Dy. Commissioner of Police, Zone 4, Ulhasnager.
Behind Central Hospital, Near Central Police Station, Ulhasnager - 3
Email Id - cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No. 9819028279

प्रेसनोट क्र. दिनांक ०१/०९/२०२५

विठ्ठलवाडी पोलीसांकडुन जबरी चोरीचा गुन्हा उघड करून आरोपीस अटक

फिर्यादी अजयकुमार शामल गौतम, वय २७ वर्षे, धंदा. शिवणकाम रा. राशन ऑफिसचे बाजुला, हिललाईन पोलीस ठाणेचे मागे, प्रेम टेकडी, उल्हासनगर ५ मुळ गाव रा.मगदुमपुर जि. कोसांबी,प्रयागराज उत्तरप्रदेश यांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहुन फिर्याद दिली कि, दिनांक २२/०८/२०२५ रोजी १९:०० वा. ते १९.३० वा.चे दरम्याण फिर्यादी व त्यांचे साथिदार हे रिक्षाने श्रीराम चौक ते उल्हासनगर ५ असे जात असताना आरोपीत यांने सरकारी प्रसुती हॉस्पिटलचे पुढे रिअल टच दुकानाचे कोपऱ्यावर उल्हासनगर ४ रिक्षा थांबवुन फिर्यादीला म्हणाला कि,''तु माझे अंगावर का थुंकला?'' त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणाले '' आम्ही कोणीही थुंकलो नाही '' तरी देखील फिर्यादी व त्यांचे साथिदार यांना शिवीगाळ करून त्यांचे सोबत वाद घालुन हाताचे चापटीने मारहान करून दमदाटी करून तेथिल कारा मोटर्स समोरील गल्लीमध्ये चाकुचा धाक दाखवून घेवुन गेला आणि आरोपीत याने त्याचे हातातील चाकुचा धाक दाखवुन फिर्यादी व साक्षीदार यांचेकडील एकुण २१००० रोख रूपये जबरीने काढुन घेवुन ॲटो रिक्षा क्रमांक एमएच ०५ बीजी ९७९१ वरील चालकास चाकुचा धाक दाखवून त्यामधुन उल्हासनगर रेल्वे स्टेशनच्या दिशेने पळुन गेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून लागलीच विठ्ठलवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नबंर I ५८१/२०२५ बी.एन.एस २०२३ चे कलम ३०९ (६), ३५२, ३५१(२), ३(५), प्रमाणे दिनांक २३/०८/२०२५ रोजी स्टे.डा.नंबर –०७/०१:५४ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. अशोक कोळी, विठ्ठलवाडी पोलीस ठाणे, उल्हासनगर ४ यांचे अधिपत्याखाली पोउनि. बी. आर. दराडे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार हे सी. सी. टि. व्ही. फुटेजच्या आधारे शोध घेत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोशि/४३०० मंगेश वीर यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नमुद गुन्हयातील सी. सी. टि. व्ही. फुटेज मध्ये दिसणारा इसम हा सर्टीफाय स्कुल समोरील मैदानात, उल्हासनगर–४ या ठिकाणी येणार असल्याची माहीती मिळाल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/हर्षल कुलकर्णी, पोउनि/बी. आर. दराडे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी सदर बातमीच्या अनुषंगाने सर्टीफाय स्कुल समोरील मैदानात, उल्हासनगर–४ येथे जावुन तेथे सापळा लावुन इसम नामे संजय रतन राठोड वय २३ वर्षे, धंदा. बिगारीकाम, रा. प्रकाशनगर, शिवमंदिर रोड, बारकुपाडा पाटील किराणा स्टोअर्स जवळ, अंबरनाथ पुर्व, जि. ठाणे यांस ताब्यात घेवुन त्यांस सदर गुन्हयात दिनांक ०१/०९/२०२५ रोजी ०२:०२ वाजता अटक केले आहे. त्याचेकडुन गुन्हयात चोरी केलेली रोख रक्कम २१,०००/– रूपये तसेच गुन्हा करतेवेळी वापरलेला चाकु हस्तगत करण्यात आले असून सदर आरोपीस मा. न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक ०३/०९/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर असुन पुढील तपास पोउनि/बी. आर. दराडे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्री. आशुतोष डुंबरे सर, पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, सह पोलीस आयुक्त,ठाणे शहर, श्री. संजय जाधव, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक

विभाग, कल्याण श्री. सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ– ४,उल्हासनगर श्री.अमोल कोळी सहा. पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अशोक कोळी, श्री. चंद्रहार गोडसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि हर्षल कुलकर्णी, पोउनि बंकटस्वामी दराडे, व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोहवा/१०७२ रामदास मिसाळ, पोहवा/६६ सुजित निचिते, पोहवा/६३१९ हरिश्चंद्र घाणे, पोहवा/५९५ पाटील, पोहवा/४६३६ दिलीप चव्हाण, पोना/७३२७ संतोष सांगळे, पोशि/७६३६ गणेश राठोड, पोशि/७२९८ सुनिल गावित, पोशि/३६२१ बुरकुल, पोशि/८२४४ हनुमंत सानप, पोशि/४३०० मंगेश वीर, पोशि/८३८४ चंद्रकांत गायकवाड पोशि/८२७० सागर मोरे यांनी केली आहे.